# जिल्हा परिषद रत्नागिरी
## सरळसेवा भरती प्रकिया २०२३

## जाहिर निवेदन

जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत गट-क मधील १८ संवर्गातील एकूण ७१५ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबतची जाहिरात दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीसाठी दिनांक ०५ ऑगस्ट २०२३ ते दिनांक २५ ऑगस्ट २०२३ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. सदर परीक्षेची संपूर्ण भरतीप्रक्रिया शासनाने मान्यता दिलेल्या आय.बी.पी.एस. या कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. त्यामुळे सदर परीक्षा अत्यंत पारदर्शक व काटेकोर पध्दतीने होणार आहे. तथापि, काही समाज विघातक प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून प्रलोभन दाखवून आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा फसवणुकीपासून उमेदवारांनी दक्षता घ्यावी, तसेच अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये, अन्यथा अशी फसवणूक झाल्यास शासन अथवा जिल्हा परिषद रत्नागिरी जबाबदार राहणार नाही. अशा प्रकारे कोणतीही व्यक्ती परीक्षेसंदर्भात आर्थिक मागणी करीत असल्याबाबत निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुध्द जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात यावी, असे सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे.

दिनांक :- ११.०९.२०२३
स्थळ :- रत्नागिरी

(किर्ती किरण पुजार, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद रत्नागिरी